# नवी मुंबई महानगरपालिका
## स्थायी समिती

**स्थायी समितीच्या दिनांक १३ मार्च २०१८ रोजी** (दि.०५/०३/२०१८, दि.०७/०३/२०१८ व दि.१२/०३/२०१८ रोजीची अर्थसंकल्पीय-विशेष तहकूब सभा) **भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| **विषय क्र.०१**<br>**दि. ०५ मार्च २०१८** | सन २०१७-१८ चे जमा व खर्चाचे सुधारित व सन २०१८-१९ चा मुळ अर्थसंकल्प यावर विचार करण्याबाबत. |
| **ठरविण्यात आले:-**<br>**ठराव क्र.३१३** | मुंबई महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९६ अन्वये तयार केलेला सन २०१७-२०१८ चे सुधारीत व सन २०१८-२०१९ च्या मुळ अर्थसंकल्पात जमेच्या बाजुमध्ये एकूण रु.१९७ कोटीची वाढ व खर्चाच्या बाजुमध्ये रु.१९७ कोटीची वाढ करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सन २०१७-२०१८ च्या सुधारीत आरंभीच्या शिल्लकेसह रु.२९८७१४.३६ लक्ष जमा व एकूण खर्च रु.२३९७४६.२८ व अखेरची शिल्लक रु.५८९६८.०८ लक्ष इतक्या रक्कमेला मान्यता देत आहे. तसेच सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधिन राहून सन २०१७-२०१८ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय तरतुदींचा विनियोग करणेस मान्यता देत आहे. अशाप्रकारे सन २०१८-२०१९ च्या मुळ अर्थसंकल्पातील आरंभिची शिल्लक रु.५८९६८.०८ लक्ष सह जमा रु.२७५९२५.५५ लक्ष मिळून एकूण रु.३३४८९३.६३ लक्ष जमा आणि एकूण खर्च रु.३३४७९३.७२ लक्ष असून शिल्लक रु.९९.९१ लक्षचा अर्थसंकल्प "अ", "क" आणि "पी" मंजूर करुनअंतिरित्या स्वीकृत करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा. |
| **निर्णय :-** | **मंजुर करुन मनपास शिफारस.** |
| **विषय क्र.०२**<br>**दि. ०५ मार्च २०१८** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन २०१७-२०१८ चा सुधारित आणि सन २०१८-२०१९ चा मुळ अर्थसंकल्प यावर विचार करण्याबाबत. |
| **ठराव क्र.३१४** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन २०१७-२०१८ चा सुधारित आणि सन २०१८-२०१९ चा मुळ अर्थसंकल्प अंतिमरित्या स्विकृत करण्यासाठी महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावा." |
| **निर्णय :-** | **मंजुर करुन मनपास शिफारस.** |
| **विषय क्र.०३**<br>**दि. ०५ मार्च २०१८** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचा सन २०१७-२०१८ चा सुधारित आणि सन २०१८-२०१९ चा मुळ अर्थसंकल्प यावर विचार करण्याबाबत. |
| **ठराव क्र.३१५** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचा सन २०१७-२०१८ चा सुधारित आणि सन २०१८-२०१९ चा मुळ अर्थसंकल्प अंतिमरित्या स्विकृत करण्यासाठी महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावा." |
| **निर्णय :-** | **मंजुर करुन मनपास शिफारस.** |

**सही/-**
(चित्रा बाविस्कर)
महापालिका सचिव
नवी मुंबई महानगरपालिका

तयार केले :-

1) राजेंद्र शा.पवार (मा.नो./लि.) --------

1) अशोक र.देसाई (मा.नो./लि.) --------